# बृहन्मुंबई महानगरपालिका

**परिपत्रक**

क्र. LO/LEA/009273
दि.१६.०३.२०२३

विषय - महानगरपालिकेशी संबंधित विविध न्यायालयात दाखल न्यायालयीन दाव्यांमध्ये संबंधित खाते / विभाग / कार्यालये यांनी विधि विभागास विनाविलंब माहिती पुरविणेबाबत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विरुद्ध / वतीने विविध न्यायालयात न्यायालयीन दावे / प्रकरणे दाखल केली जातात. अशा दावे / प्रकरणांचे कामकाज हे विधि खात्यामार्फत पाहण्यात येते.

महानगरपालिकेशी संबंधित विविध न्यायालयात दाखल होणाऱ्या अनेक दावे/ प्रकरणांमध्ये संबंधित विभाग / खाते / कार्यालये यांचेकडून विहित मुदतीत आवश्यक माहिती देण्यात येत नाही. यामुळे, विधि खात्यातील वकील/ विधिज्ञ हे आवश्यक माहिती न मिळाल्याने महानगरपालिकेची बाजू प्रभावीपणे न्यायालयात मांडू शकत नाही. परिणामी, अनेक न्यायालयीन प्रकरणांमध्ये न्यायालयाकडून ताशेरे ओढले जातात / नाराजी व्यक्त केली जाते. नुकत्याच एका न्यायालयीन प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी वरील बाब निदर्शनास आणून दिली आहे.

तदनुषंगाने, सर्व सहाय्यक आयुक्त / खाते प्रमुख / विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख / अधिष्ठाता यांना खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१. महानगरपालिकेशी संबंधित विविध न्यायालयात दाखल झालेल्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये खाते / विभाग / कार्यालये यांनी त्यांचेशी संबंधित आवश्यक माहिती लेखी स्वरूपात विनाविलंब विधि खात्यास पाठविण्यात यावी.

२. प्रत्येक न्यायालयीन प्रकरणांमध्ये महानगरपालिकेतर्फे शपथपत्र / लेखी जबाब सादर करण्याकरिता परिच्छेदनिहाय अभिप्राय संबंधित खाते / विभाग / कार्यालये यांनी विधि खात्यास लेखी स्वरूपात पाठविण्यात यावेत.

३. प्रत्येक न्यायालयीन प्रकरणांमध्ये संबंधित अधिकारी यांनी व्यक्तिश: प्रत्येक सुनावणीच्या वेळी आवश्यक कागदपत्रांसह न्यायालयात हजर राहावे.

४. संबंधित खाते / विभाग / कार्यालयांनी न्यायालयीन प्रकरणांमध्ये पारित होणाऱ्या आदेशांची अंमलबजावणी विहित कालमर्यादेत करावी.

५. न्यायालयातील आपल्या संबंधित खात्यातील प्रकरणांमध्ये आवश्यक लेखी माहिती ही महानगरपालिका वकिल / विधि खाते यांना पाठविलेली आहे किंवा नाही व सदर न्यायालयीन प्रकरणांमध्ये प्रतिज्ञापत्र अथवा लेखी उत्तर महानगरपालिकेतर्फे सादर केले आहे किंवा कसे याबाबत खातरजमा करण्याची तसेच न्यायालयीन प्रकरणांमध्ये आदेशांची अंमलबजावणी विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी केली आहे किंवा कसे याची पडताळणी करण्याची संपूर्णपणे जबाबदारी खालील अधिका-यांची राहील.

| अ.क्र. | कार्यालये / खाते / विभाग | अधिकारी ( Officers) |
|---|---|---|
| १ | सर्व विभाग (Wards) कार्यालये | संबंधित सहाय्यक आयुक्त (Asstt. Commissioner) |
| २ | प्रमुख अभियंता (विकास नियोजन) | प्रमुख अभियंता, विकास नियोजन ( Chief Engineer ,D.P .) |
| ३ | मालमत्ता खाते | संबंधित प्रशासकीय अधिकारी (Administrative Officer) |
| ४ | नगर अभियंता खाते | नगर अभियंता ( City Engineer) |
| ५ | अग्निशमन दल | संबंधित विभागीय अग्निशमन अधिकारी (Div. Fire Officer) |
| ६ | जल अभियंता | जल अभियंता ( Hydraulic Engineer) |
| ७ | अन्य खाते / रूग्णालये / शिक्षण खाते | संबंधित खाते प्रमुख / अधिष्ठाता / शिक्षण अधिकारी |

६. सर्व सहाय्यक आयुक्त / खाते प्रमुख /कार्यालय प्रमुख / प्रमुख अभियंता / अधिष्ठाता यांनी नियमित विविध न्यायालयात दाखल न्यायालयीन प्रकरणांच्या सद्यस्थितीचा आढावा घ्यावा.

सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने सर्व संपर्क अधिकारी / सर्व सहाय्यक आयुक्त / सर्व खाते प्रमुख / कार्यालय प्रमुख / प्रमुख अभियंता / अधिष्ठाता यांनी वरिल परिपत्रकातील आदेशांचे

काटेकोरपणे पालन करावे. सदर बाबतीत कोणतीही हलगर्जी किंवा दुलर्क्ष झाल्यास वरील संबंधित अधिका-यांना व्यक्तिशी जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| | | |
|---|---|---|
| सही /- | सही /- | सही /- |
| (०६.०३.२०२३) | (०६.०३.२०२३) | (१२.०३.२०२३) |
| (सुनिल सोनवणे) | (मिलिन सावंत) | (डॉ. इ सिं चहल) |
| **कायदा अधिकारी** | **सह आयुक्त (सा.प्र.)** | **महानगरपालिका आयुक्त** |

प्रत ---------------------------------------------------------------

यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी कृपया अग्रेषित.

कायदा अधिकारी

विधि खाते